# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**वाई (जि.सातारा) येथील कृष्णा नदीवरील पुलाच्या दुरवस्थेबाबत**

**(१) ७७२२ (१०-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाई (जि.सातारा) येथील कृष्णा नदीवर सुमारे ११५ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला ब्रिटीशकालीन पुल दोन्ही बाजूंनी जंगली झाडेझुडपांनी व्यापलेला असून दुरवस्थेत असलेल्या सदर पुलाचे वयोमान पाहता याबाबत सविस्तर चौकशी/तांत्रिक तपासणी करुन अहवाल अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांनी सादर केला आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर पुलाच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) व (२) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा यांच्या अहवालानुसार सदर पुलाची सविस्तर चौकशी/तांत्रिक तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आली नाही.

सद्य: स्थितीत दुरुस्ती नगरपरिषदे मार्फत करण्यात येत आहे.

तथापि, याबाबत जिल्हाधिकारी यांना दिनांक २४.०३.२०१७ च्या पत्रान्वये सर्व संबंधितांची बैठक घेवून पुढील १ महिन्यात आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महानगरपालिका आयुक्तांना विभाग अधिकाऱ्यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचे अधिकार देण्याबाबत

**(२) १३६६९ (०७-०४-२०१५). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका आयुक्तांना त्यांच्या अखत्यारित असलेल्या सहायक आयुक्तांना म्हणजेच विभाग अधिकाऱ्यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत व त्यानुसार महानगरपालिकांमध्ये सहायक आयुक्तांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या सहायक आयुक्तांनी पदनिर्देशित अधिकारी या पदाची जबाबदारी घेण्यास नकार दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहायक आयुक्तांच्या नकारामुळे मुंबई महानगरपालिकेमध्ये महानगरपालिका आयुक्तांद्वारे सहायक अभियंत्यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, 'पदनिर्देशित अधिकारी' या पदाची जबाबदारी घेण्यास नकार देणाऱ्या सहाय्यक आयुक्तांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे,

(५) तसेच नकार देणाऱ्या सहाय्यक आयुक्तांनी 'पदनिर्देशित अधिकारी' या पदाची जबाबदारी घ्यावी म्हणून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) महाराष्ट्र अधिनियम II/२०१२ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग-चार, दिनांक १३ मार्च, २०१२ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे.

सदर सुधारेणेनुसार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३५१(१) अन्वये, त्यांच्या अखत्यारीतील पदनिर्देशित अधिकारी म्हणून अधिकाऱ्यांचे पद राजपत्रातील अधिसूचनेत प्रसिध्द करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

त्यानुसार तत्कालिन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३५१(१) मधील अधिकाराचा वापर करुन महानगरपालिकेच्या संबंधित विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने) यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील ५० ते १०० वर्ष जुन्या बहुमजली चाळींना भूकंपाचा धोका असल्याबाबत**

**(३) १६७४८ (१२-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील ५० ते १०० वर्ष जुन्या बहूमजली खाजगी, बीआयटी, बीडीडी या उपकर प्राप्त व उपकर नसलेल्या चाळींना भूकंपाचा सर्वाधिक धोका असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काळबादेवी व भुलेश्वर परिसरातील अनेक इमारतीच्या मुळ बांधकामामध्ये बदल करुन अनेक व्यापा-यांनी व गाळेधारकांनी बेकायदा उद्योगासाठी सदर जागेचा वापर करीत असल्यामुळे या इमारतींच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व इमारतींची स्ट्रक्चर ऑडीट करण्यात येणार आहे काय, त्यानुसार बेकायदा बदल केलेल्या गाळेधारकांवर व मालकांवर काय कारवाई करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, भूकंपाचा धोका लक्षात घेता सदरहू जून्या व मोडकळीस आलेल्या चाळींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) :**(१) जुन्या जीर्ण झालेल्या इमारती ह्या मानवी जिवितास धोकादायक असल्याने भूकंप झाल्यास त्यापासून त्यांना सर्वाधिक धोका असल्याची वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

(२) काळबादेवी व भुलेश्वर परिसर हा भाग प्रामुख्याने वाणिज्य स्वरुपाचा असल्याचे येथील रहिवाशी इमारतीचा वापर उद्योगासाठी होतो, ही बाब खरी आहे.

(३) स्ट्रक्चर ऑडीट करुन घेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५३(बी) नुसार इमारत मालकांना नोटीसा बजावलेल्या आहेत. त्याचप्रमाणे बेकादया बदल केलेल्या गाळेधारकांवर व मालकांवर उपभोक्ता बदलाविरोधात मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३४७ (बी) नुसार कारवाई करण्यात आली आहे.

(४) व (५) मानवी जिवीताचा विचार करता धोकादायक भाडेकरुव्याप्त इमारतींची पुनर्बांधणी/पुनर्विकास होणे अत्यावश्यक आहे. यासंदर्भात इमारत मालकांस सदर इमारतीची पुनर्बांधणी करु शकत नसल्यास भाडेकरुंना ती करु देणेस अनुमती देणे यासंदर्भाने मुंबई महानगरपालिका अधिनियमामधील कलम ३५४ व ४९९ मध्ये सुधारणा करणेत आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे अशा बिगर उपकरप्राप्त धोकेदायक भाडेकरुव्याप्त इमारतींच्या पुनर्विकासाबाबत प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांकाची तरतूद नसल्याने याबाबतचे विनियम बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेचा निर्णय घेणेत आलेला आहे. याबाबतच्या प्रारुप विनियमावर नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणारी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अेअे) खालील सूचना दिनांक २.१.२०१७ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. याबाबत वैधानिक कार्यवाही सुरु असून ती पूर्ण झाल्यानंतर अंतिम निर्णय संकल्पित आहे.

त्याचप्रमाणे बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी स्वतंत्र विकास नियंत्रण विनियम, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेत आलेले आहेत. म्हाडाकडून निविदा मागवून सदर चाळींचा पुनर्विकास करणेत येत आहे.

---

## अंबरनाथ नगरपरिषदेने अंरनाथ पुर्व - पश्चिम जोडणारा रेल्वे ओव्हर ब्रिज बांधणेबाबत

**(४) २०३६२ (११-०८-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ नगरपरिषदेने अंबरनाथ पुर्व - पश्चिम जोडणारा रेल्वे ओव्हर ब्रिज बांधणेकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी एम.एम.आर.डी.ए कडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ नगरपरिषदेने सन २००५ च्या मंजुर विकास आराखड्यामध्ये मोरीवली विभाग येथे अंबरनाथ पूर्व - पश्चिम जोडणारा रेल्वे ओव्हर ब्रिज बांधण्याच्या नियोजनास सर्वसाधारण सभेमध्ये ठरावाद्वारे प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबरनाथ नगरपरिषदेने सादर केलेल्या प्रस्तावाबाबत एम.एम.आर.डी.ए ने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय व सदर प्रस्तावाबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

ओव्हर ब्रिज बांधणेकरीता दि.०७/१०/२०१४ रोजीच्या पत्रान्वये रक्कम रु. १७ कोटी इतका निधी उपलब्ध करणेसाठी आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

नगरपरिषदेने सदर रेल्वे ओव्हर ब्रिज बांधण्याकामी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१८४ दि.२४/१०/२००७ अन्वये ठराव पारित केला आहे.

(३) याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना एम.एम.आर.डी.ए. व नगरपरिषद, अंबरनाथ यांच्यासमवेत बैठक घेऊन आवश्यक कार्यवाही करावी अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्ह्यातील फोंडाघाट आय.टी.आय. मध्ये अध्यापनासाठी शिक्षक उपलब्ध नसल्याबाबत**

**(५) ३०१२२ (२३-१२-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील फोंडाघाट आय.टी.आय. मध्ये अध्यापनासाठी शिक्षकच उपलब्ध नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदयार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांची त्वरीत नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-०४-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील फोंडाघाट औ.प्र.संस्थेमध्ये एकूण १२ शिक्षकीय पदे मंजूर आहेत. सदर पदांपैकी नियमित वेतनश्रेणीत २ आहेत. सदर पदांपैकी नियमित वेतनश्रेणीत २ पदे कोकण विकास पॅकेज अंतर्गत ठोक वेतनावर ०७ पदे व कंत्राटी तत्वावर ठोक वेतनावर ०३ पदे मंजूर आहेत.

नियमित वेतनश्रेणीतील ०२ पदे भरलेली आहेत. तसेच कोकण विकास पॅकेज अंतर्गत मंजूर पदांपैकी शिल्प निदेशकाची ०३ व गणित व चित्रकला निदेशकाच्या ०१ पदासाठी संस्थास्तरावर तासिका तत्वावर नेमणूक करण्यात आली आहे.

सदर औ.प्र. संस्थेत १० व्यवसायांना मान्यता आहे. तथापि, २ व्यवसाय अभ्यासक्रम सहा महिने मुदतीचे असल्याने डीजीईटीच्या निर्देशानुसार बंद केले आहेत. २ व्यवसायांना डीजीईटीची संलग्नता नसल्याने प्रवेश देण्यात आलेले नाहीत व १ व्यवसायात प्रवेश झालेला नसल्याने बंद आहे. उपरोक्त कारणांमुळे केवळ ५ व्यवसायांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.

(२) उपप्रश्न १ मध्ये नमूद वस्तुस्थितीनुसार प्रवेश देण्यात आलेल्या ५ व्यवसायांमध्ये अध्यापनासाठी ६ शिक्षक उपलब्ध आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओसवालनगरी सेंट्रल पार्क नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील अनधिकृत गाळ्यांची बेकायदेशीररित्या सुरु असलेली विक्री**

**(६) ३९६७७ (१३-०५-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) ओसवालनगरी सेंट्रल पार्क परिसरात ९० फूट रस्त्याच्या मधोमध व आजुबाजुच्या परिसरात अनधिकृत गाळ्यांच्या बांधकामांची विक्री सुरु असून सदर अनधिकृत गाळे एम.आर.टी.पी. अंतर्गत निष्काषीत करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री तसेच आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वसई-विरार महानगरपलिकेने खालीलप्रमाणे कारवाई केलेली आहे :-

- दिनांक १९.०३.२०१५ रोजी जमिन मालकाला महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम (MRTP) अंतर्गत नोटीस बजावली होती.
- तसेच याप्रकरणी ४६ गाळे पोलीसांच्या मदतीने २ टप्प्यांमध्ये निष्कासित करण्यात आले आहेत.
- संबंधितांवर तुळीज पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करणेकामी कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागांमार्फत विशेष मुलांसाठी चालविल्या जाणाऱ्या १८ शाळांतील विद्यार्थी सोयीसुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(७) ४०४८५ (१३-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागांमार्फत विशेष मुलांसाठी चालविल्या जाणाऱ्या १८ शाळांतील विद्यार्थी सोयीसुविधांपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या शाळांकरिता महानगरपालिका अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर शाळांना सन २००६ पासून समाजकल्याण विभागाची मान्यताही नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार विशेष विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देणे व वैद्यकीय तपासणीसाठी फिजिओथेरपिस्ट तज्ञाची आवश्यकता असते परंतु हे सर्व नियम महापालिकेकडून पायदळी तुडवली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासन सदर शाळांना सोयीसुविधा पुरवण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(६) असल्यास, कधीपर्यंत सर्व शाळांना सोयीसुविधा उपलब्ध होणार आहेत,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत संबंधित जिल्हा समाज कल्याण कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४), (५) व (६) शिक्षण हक्का कायद्यानुसार सदर शाळांमधील विशेष विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- केंद्र व राज्य शासन पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना वैद्यकीय पुनर्वसनात्मक सेवा सुविधा पुरविल्या जातात.
- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिकेने अलिम्को संस्थेमार्फत सदर विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे वैद्यकीय पुनर्वसन व शैक्षणिक साहित्याचे वाटप केले आहे.
- विशेष शाळांमधून सदर विद्यार्थ्यांची वर्षातून दोन वेळा शाळा स्तरावर वैद्यकीय तपासणी केली जाते.
- महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमधून विशेष विद्यार्थ्यांना आवश्यक फिजिओ थेरपी विनामूल्य उपलब्ध करुन दिली जाते.
- विशेष विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी औषधे वा शस्त्रक्रिया महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपलब्ध करुन दिली जातात.
- स्वयंसेवी संस्थेमार्फत ८ विशेष शाळांमध्ये ऑक्युपेशल थॅरेपिस्टची सेवा उपलब्ध आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील जलतरण तलावाच्या गळतीतून होणाऱ्या नुकसानीबाबत

**(८) ४१००६ (१७-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील सुमारे १६ वर्षापूर्वीच्या आंतरराष्ट्रीय शाहु जलतरण तलावास गळती सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गळती काढण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आजपर्यंत तब्बल १४ लाख खर्च करूनही अद्यापी गळतीचे प्रमाण सुरु आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय एकात्मता विकास योजनेतून या तलावाच्या विकासासाठी निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाकडून शासनाकडे प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१६) :**(१) काही प्रमाणात गळती होत आहे, हे खरे आहे.

(२) आयुक्त कोल्हापूर यांना याबाबत व्यक्तीश: पाहणी करुन एका महिन्याच्या आत आश्यक ती उपाययोजना करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेशातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता तळोजा येथील भराव भूमी प्रकल्प उभारण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(९) ४१२०१ (०७-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार व मुलुंड येथील क्षेपणभूमीची क्षमता संपली असून कांजुर मार्ग येथील क्षेपणभूमीवर टाकण्यात येणाऱ्या कच-यावरील प्रक्रिया करणारे प्रकल्प ठप्प पडले आहेत अशा परिस्थितीत तळोजा येथील नियोजित क्षेपणभूमीचे काम लवकर कार्यान्वित न झाल्यास येथील नागरीकांना दुर्गंधी व घातक आरोग्यास सामोरे जावे लागणार असल्याचे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, ही बाब खरी आहे काय,

(२) तसेच, मुंबई महानगर प्रदेशातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी या शहरांमधील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता तळोजा येथील भराव भूमी प्रकल्प सुरु करण्यात येईल अशी घोषणा मा.राज्यपाल यांनी दिनांक २३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळोजा क्षेपणभूमीचा प्रल्प पुर्णपणे कार्यान्वित होण्यासाठी शासनाकडून काही कालमर्यादा आखण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, तळोजा भराव भूमी प्रकल्पाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) हे खरे नाही.

देवनार व मुलुंड क्षेपणभूमी येथे ओपन डंपिंग पध्दतीने कचरा स्विकारण्यात येत असून, मार्च २०१५ पासून कांजूर भरावभूमी येथे स्विकारण्यात येणाऱ्या सुमारे ३००० मे. टन कचऱ्यावर शास्त्रोक्तरित्या बायोरिएक्टर तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया केली जाते.

(२) हे खरे आहे.

(३) याबाबत शासनाकडून कालमर्यादा आखण्यात आलेली नाही.

(४) व (५) तळोजा येथील एम.एम.आर.डी.ए. कडे आगाऊ ताबा असलेल्या एकूण १२६ हेक्टर जमिनीपैकी सुमारे ५२.१० हेक्टर (शासकीय ३९.९० व खाजगी १२.२०) जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेस घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आगाऊ ताबा देण्यास राज्य शासनाने सप्टेंबर, २०१५ मध्ये मान्यता दिलेली आहे.

सदर जमिनीपैकी सुमारे ३८.८७ हेक्टर जमिनीचा आगाऊ ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी जानेवारी, २०१६ मध्ये आदेश पारित केले. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने संयुक्त मोजमापणीचे शफलक भरुन संयुक्त मोजमापणी करण्यास स्थानिक नागरिकांकडून विरोध दर्शविल्यामुळे सदर संयुक्त मोजमापणी पूर्ण होऊ शकली नाही.

सदर शासकीय जमिनीमध्ये असलेले अतिक्रमण हटविण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच एकूण ५२.१० हेक्टर जमिनीपैकी सुमारे १२.२० हेक्टर खाजगी जमिनीचे अधिग्रहण करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## सोपारा आणि गास गाव (नालासोपारा) येथील बांधकाम व्यावसायिकांनी बेकायदेशीर बांधकाम केल्याबाबत

**(१०) ४१२१२ (१३-०५-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा येथील सोपारा आणि गास गाव येथील रॉबर्ट तुस्कानो, हितेश जैन व मयुर शहा या बांधकाम व्यावसायिकांनी महानगरपालिकेकडून देण्यात आलेल्या बांधकाम परवान्यांमध्ये फेरफार करुन बंगल्याऐवजी चार मजल्याच्या १० इमारती उभारल्याची धक्कादायक माहिती दिनांक ६.१.२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकरणी वसई-विरार महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे उप संचालक वाय.एस. रेडडी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नालासोपारा पोलीस ठाण्यात बनावट कागदपत्रे तयार करुन, बेकायदेशीर बांधकाम केल्याप्रकरणी तक्रार नोंदविली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, नालासोपारा व विरार या परिसरात बनावट कागदपत्राच्या आधारे अनेक विकासकांनी लोकांची फसवणूक केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी व्यावसायिकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने एकूण १७३९ चौ.मी. क्षेत्रफळाकरीता बांधकाम परवानगी दिलेली आहे.

तसेच सदर ठिकाणी एकूण २२५१२.४६ चौ.मी. चे बांधकाम झालेले असून २०७७२.७६ चौ.मी. इतके वाढीव बांधकाम अनधिकृतपणे झालेले आहे.

(३) व (४) या प्रकरणी संबंधित विकासकावर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर विषयी सकृतदर्शनी अनियमितता झाल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे याप्रकरणी आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना चौकशी करुन चौकशी अहवाल चार आठवड्यात शासनास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसमत (जि.हिंगोली) येथील प्रियदर्शनी उद्यान अवैध व्यावसायिकांनी व्यापले असल्याबाबत**

**(११) ४१३३९ (१७-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) येथील प्रियदर्शनी उद्यान अवैध व्यावसायिकांनी व्यापले असून याकडे वसमत नगरपालिकेचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उद्यानातील बेकायदेशीर धंदे थांबवून त्याची दुरावस्था करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) वसमत नगरपरिषदेचे प्रियदर्शनी उद्यान विकसित करण्याकरीता वैशिष्टपूर्ण अनुदान २०१५-१६ अंतर्गत शासनाने रु. ४ कोटीचा निधी वितरीत केला आहे. सदर कामास जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रशासकीय मान्यता दिली असून दोन कामे १) संरक्षण भिंत बांधकाम २) शिवउद्यान सुशोभिकरण सुरु करण्यात आली आहेत, उर्वरीत १७ कामाचे आदेश देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यतील नगरपरिषदेच्या विविध समित्यांना वित्तीय मंजुरीचे अधिकाराची मर्यादा वाढविणेबाबत**

**(१२) ४२१५२ (१७-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यतील नगरपरिषदेच्या विविध समित्यांना वित्तीय मंजुरीचे अधिकाराची मर्यादा अनेक वर्षापासून न बदलल्यामुळे समित्यांना काम करणे अत्यंत अवघड झाले आहे, त्यामुळे नगरपरिषदेच्या कामकाजावर मोठा परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगमनेर नगरपरिषदेच्या (जि.अहमदनगर) विषय समिती व स्थायी समिती यांच्या खर्च मर्यादेत बंधने असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे नगरपरिषद विषय समितीसाठी १.५ लक्ष व स्थायी समितीसाठी रु.५ लक्ष मर्यादेच्या अधिकारात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) होय.

सन २०१२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ दिनांक ०४ ऑगस्ट, २०१२ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार विविध समित्यांना वित्तीय मंजुरीच्या अधिकाराची मर्यादा वाढवून देण्याबाबतचे नियम तयार करण्यात येत आहे.

---

**ठाणे येथील मखमल तलावासमोर एका भूखंडावर बेकायदाशीर मॅरेज हॉलचे बांधकाम केल्याबाबत**

**(१३) ४२८४३ (०३-०५-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मखमल तलावासमोर एका भूखंडावर बेकायदाशीर मॅरेज हॉल उभारण्यात आला असून इंडस्ट्रीयल इस्टेटमधील भूखंडावर करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम त्वरीत तोडण्यात यावे व याबाबत अहवाल शासनास सादर करावा असे आदेश सन्मा.मुख्यमंत्र्यांनी ठाणे महानगरपालिका आयुक्तांना दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) व (२) होय.

तथापि, सदर प्रकरणी ठाणे महानगरपालिकेचा अहवाल प्राप्त केला असता याप्रकरणी न्यायालयाचे "जैसे थे" आदेश आहेत. त्यामुळे याप्रकरणी कोणताही हस्तक्षेप करता येणार नाही, असे आयुक्त ठाणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

सदरची वस्तुस्थिती मा.मुख्यमंत्री महोदयांना अवगत करुन देण्यात आली आहे. तसेच याप्रकरणी ठाणे महानगरपालिकेस नियमोचित कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमनेर नगरपरिषदेला नागरी पाणी पुरवठा व पथदिवे यावरील वीजबिलात सवलत मिळण्याबाबत

**(१४) ४२९५४ (१७-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर नगरपरिषदेची आर्थिक बाजू कमकुवत असल्याने नागरी पाणी पुरवठा व पथदिवे याचे वीजबिल भरणे शक्य होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नगरपरिषदेत नागरी पाणी पुरवठा व पथदिवे यावरील वीजबिलात सवलत मिळावी, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) संगमनेर नगरपरिषदेस पाणी पुरवठ्याच्या व वीजेच्या देयकांच्या अदायगीकरीता प्रतिवर्ष सुमारे रु.१.८० कोटी एवढा खर्च येतो. नगरपरिषदेची आर्थिक स्थिती सक्षम नसताना अत्यावश्यक सेवा खंडीत होऊ नये म्हणून या देयकांची अदायगी करण्यात येत असल्याचे मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद यांनी कळविले आहे.
(२) नगरपरिषदा/ नगरपंचायती यांना सहायक अनुदान, रस्ते अनुदान, १४ वा वित्त आयोग इत्यादीमधून विविध प्रकारचा निधी शासनातर्फे दिला जातो. सदरचा निधी व स्वनिधी यामधून या नागरी स्थानिक संस्थांनी या प्रयोजनार्थ खर्च करणे आवश्यक आहे.

नगरपरिषदेने स्वनिधीत वाढ करण्याच्या दृष्टीने उत्पन्नाची साधने/ स्त्रोत यांचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमनेर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना पाचवा व सहावा वेतन आयोगाचे फरक देण्याबाबत**

**(१५) ४२९७० (१७-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना पाचवा व सहावा वेतन आयोगाचे फरक देण्यासाठी वसूलीची अट घातली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर अट रद्द करुन येथे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) दिनांक २५ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या आदेशान्वये ज्या नागरी स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांची शासकीय मालमत्ता वगळून अन्य मालमत्तांचे बाबतीतील मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसुली ९० टक्केपेक्षा अधिक आहे अशाच नागरी स्थानिक नागरी स्वराज्य संस्था १३ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून कर्मचाऱ्यांचे थकित वेतन/ सेवानिवृत्ती विषयक लाभ अदा करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांची परवानगी मागण्यास पात्र ठरण्याबाबतची तरतूद विहित केली आहे.

(२) नगरपरिषदेने विशेषत्वाने मालमत्ता व पाणीपट्टी करसंकलनासाठी प्रयत्न करुन विहित मर्यादा गाठणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईच्या गोरेगाव येथील आरे कॉलनीत कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो - ३ प्रकल्पाबाबत**

**(१६) ४४३५६ (०३-०५-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या गोरेगाव येथील आरे कॉलनीत कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो - ३ प्रकल्पासाठी कार डेपो बांधण्याचा निर्णय राष्ट्रीय हरित लवादासमारे पुणे येथे चाललेल्या सुनावणीत दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापासून लोकोपयोगी बांधकामांसाठी ५०० मीटर ऐवजी १०० मीटर अंतरापर्यंतच जागा मोकळी सोडण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) ते (३) प्रस्तुत प्रकरणी आरे कॉलनीमधील ३३ हेक्टर जागा आरे कार डेपोसाठी आरक्षित करण्यासंदर्भाने शासनाने बृहन्मुंबईच्या के/पूण प्रभागाच्या मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्तावित केलेला असून त्याबाबतची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अे) खालील नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणारी सूचना दिनांक २९.१२.२०१६ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. याबाबत वैधानिक कार्यवाही सुरु असून ती पूर्ण झाल्यानंतर शासनाचा अंतिम निर्णय संकल्पित आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने संजय गांधी उद्यानालगतची पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबतची अंतिम अधिसूचना दिनांक ५.१२.२०१६ रोजी निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचनेसमवेतच्या नकाशावर दर्शविलेले संजय गांधी उद्यानालगतचे १०० मीटर ते ४ किलोमीटर पर्यंतचे क्षेत्र हे संजय गाधी उद्यानाचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित केलेले आहे. सदर अधिसूचनेतील तरतूदीनुसार त्यामध्ये नियंत्रित व विवक्षित विकास अनुज्ञेय रहाणार आहे.

---

### ओरोस (जि.सिंधुदुर्ग) येथील विकासकामांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१७) ४४५८५ (२०-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवनगर विकास प्राधिकरणाने संपादित केलेल्या ओरोस (जि.सिंधुदुर्ग) येथील मुंबई-गोवा महामार्गालगतच्या पूर्वेकडील ७० हेक्टर क्षेत्रावरील शेती व परंपरागत निवासी आरक्षण उठविण्याचे आदेश पारित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त ओरोस येथील सर्व्हे नं १ ते ६, ११ ते १५, ३३ ते ३६ १३७ ते १४०, १४७ ते १५७, १६४, १६५ या क्षेत्रावरील परंपरागत व निवासी वापर यासह पेन्सिल नोंदीही काढण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त क्षेत्रावरील विकास कामांसंदर्भात अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे वा करण्यत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) उक्त क्षेत्राकरीता मंजूर प्रादेशिक योजना रत्नागिरी- सिंधुदुर्ग प्रदेशासाठी वेळोवेळी सुधारीत केलेले प्रादेशिक योजनेचे प्रस्ताव व त्यासाठीची विकास नियंत्रण नियमावली अनुज्ञेय आहे. या क्षेत्रातील कोणत्याही विकासकामासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ नुसार, मा.जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांची पुर्व परवानगी अनिवार्य आहे.

---

**चांदवड (जि.नाशिक) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक बांधणेबाबत**

**(१८) ४७३८३ (२०-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची नाशिक जिल्हयातील चांदवड ही कर्मभूमी असून त्याठिकाणी अहिल्यादेवी होळकर यांचा रंगमहाल असून त्याच जागेवर अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक बांधण्यात यावे अश्या प्रकारची मागणी तेथील जनतेनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जून, २०१५ रोजी निवेदनाव्दारे शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, चांदवड येथे अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०५-२०१७) :**(१) होय, या आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

(२) व (३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा चांदवड येथील रंगमहाल हे राज्य संरक्षित स्मारक आहे. नागरी क्षेत्रात स्मारके उभारण्या संदर्भात शासन निर्णय दिनांक ४ जानेवारी, २०१६ अन्वये धोरण विहित केले आहे. या संदर्भात विहित नियमानुसार तपासणी करुन स्मारकाबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिल्या आहेत.

---

**मुंबईतील ट्रॉम्बे चेंबूर, वाशी नाका, माहूल, वडाळा-सायन कोळीवाडा तसेच धारावी या भागातील जनतेच्या आरोग्य सुविधांसाठी नविन शासकीय सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची उभारणी करण्याबाबत**

**(१९) ५०७५० (१७-०५-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ट्रॉम्बे चेंबूर, वाशी नाका, माहूल, वडाळा-सायन कोळीवाडा तसेच आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी या भागातील जनतेच्या आरोग्य सुविधांसाठी नविन शासकीय सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची उभारणी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात न येण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली असल्यास, चौकशीनुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी महानगरपालिकोमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- मुंबई पूर्व उपनगरातील चेंबूर येथील शताब्दी रुग्णालयाचा टप्पेनिहाय विकास करण्याकरिता नियोजित ५५० खाटांच्या रुग्णालयाचे आराखडे तयार करण्यात आले असून, सदर इमारतीस २ चटईक्षेत्र निर्देशांकाद्वारे मंजूर करण्यात आले आहे.
- सदर इमारतीस अतिरिक्त चटईक्षेत्र मंजुर करण्यात आले असून, सदर बांधकामाचे निविदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- मुंबई पूर्व उपनगरातील मौजे मानखुर्द येथील न.भू.क्र.-२B/४B(pt.) या जागेवर पहिल्या टप्प्यात २३६ खाटांचे व दुसऱ्या टप्प्यात १७४ खाटांचे प्रसुतीगृह व रुग्णालय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकासकाकडून बांधून महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात येणार आहे.
- महानगरपालिकेच्या वास्तुशास्त्रज्ञ विभागामार्फत पहिल्या व दुसऱ्या टप्प्याच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली असून, विकासकाकडून सदर जागेवर पहिल्या टप्प्याचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे.

वाशीनाका, सायन-कोळीवाडा व वडाळा भागात सुपर स्पेशालिटी हॉस्प्टिल बांधण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव महानगापालिकेस प्राप्त झालेला नाही.

---

## कौसा-मुंब्रा (जि.ठाणे) येथे कब्रस्तानांची निर्मिती करणेबाबत

**(२०) ५०८८५ (०७-०५-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौसा-मुंब्रा (जि.ठाणे) येथे मुलभूत सुविधांची कमतरता असल्याने दिवसेंदिवस तेथे राहायला येणाऱ्या लोकांच्या लोंढयामुळे लोकसंख्येचा प्रमाणात कब्रस्तानांची निर्मिती करण्याची मागणी विभागातील जागरुक नागरीक, सामाजिक,राजकीय कार्यकर्ते, विविध सामाजिक, धार्मिक संघटनाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी (जि. ठाणे), महापालिका आयुक्त (ठाणे महानगरपालिका) यांच्याकडे सातत्याने तसेच माहे मार्च व सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौसा-मुंब्रा येथे कब्रस्तांनाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७)** :(१) होय.

(२) मौजे कौसा येथील १२३/१,२,४ या भूखंडांवर कब्रस्तान आरक्षण ठेवण्याकरिता मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल प्रस्ताव महानगरपालिकेकडे प्रस्तावित असून त्याची पुढील कार्यवाही ठाणे महानगरपालिकेकडे

सुरु आहे. तसेच मौजे मुंब्रा येथील स. नं. ५१ ब पै. इत्यादी या स्मशानभूमी, मुस्लिम दफनभूमी व ख्रिश्चन दफनभूमीकरिताच्या आरक्षणाखालील २०००१.७७ चौ.मी. क्षेत्राचा आगावू ताबा भूखंडधारकांनी ठाणे महानगरपालिकेस दिलेला आहे. मौजे कौसा येथील स.नं.११५ या वन विभागाच्या जमिनींपैकी ०.९९ हे जमीन मुंब्रा कौसा विभागातील दफनभूमीसाठी संपादन करण्याचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेने वन विभागाकडे दाखल केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत असतांना वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छा निवृत्ती घेणाऱ्यांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत**

**(२१) ५१९३१ (१६-०५-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत असतांना वैद्यकिय कारणामुळे स्वेच्छा निवृत्ती घेणाऱ्या वैद्यकिय अहवालात, नोकरीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना वारस म्हणुन सेवेत घेण्याची तरतुद आहे यासाठी शासनाने लाड समितीची नेमणुक केली असून मागील १ वर्षामध्ये लाड समितीची एकही बैठक महानगरपालिकेने घेतली नाही, त्यामुळे ५४ प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाड समिती अंतर्गत अर्जदाराने महानगरपालिकेकडे अर्ज केल्यावर, ३० दिवसांत निर्णय घ्यावा, असे शासनाचे आदेश असतांनाही तसे होत नाही, शासन आदेश डावलणाऱ्या महानगरपालिका प्रशासनावर शासन कोणती कारवाई करणार व लाभार्थ्यांना त्वरीत नोकरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१७) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

लाड कमिटीच्या शिफारशीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्यासंदर्भात एकूण ६३ प्रकरणे होती. त्यापैकी खालील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या दिनांकास संपन्न झालेल्या आस्थापना समितीच्या बैठकीमध्ये पात्र ठरविलेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | समितीच्या बैठकीचा दिनांक | नियुक्ती दिलेल्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | ९.५.२०१५ | १८ |
| २ | २४.०८.२०१६ | १० |
| ३ | ०७.०९.२०१६ | १३ |
| ४ | ०३.१०.२०१६ | ०२ |
| ५ | ०६.१०.२०१६ | ०१ |
| ६ | ०७.१०.२०१६ | ०८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | १४.१०.२०१६ | ०३ |
| ८ | एकूण | ५५ |

उर्वरित ०८ प्रकरणामध्ये कर्मचाऱ्यांच्या नामनिर्देशित वारसांना लाड समितीच्या शिफारशीनुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यास त्यांचा महानगरपालिकेमार्फत नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू नगरपरिषदेतील (ता.डहाणू, जि.पालघर) नगरसेवक यांनी वाढीव बांधकाम केल्याबाबत**

**(२२) ५३०११ (१३-०५-२०१६). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू नगरपरिषदेत (ता.डहाणू, जि.पालघर) मालमत्तेचा सर्व्हे करीत असतांना डहाणू नगरपरिषदेतील नगरसेवक यांनी मालमत्ता क्र. १००३, १३०, १००३ व १३१ च्या मोजमापाप्रमाणे १७१० चौ. फुटाचे वाढीव बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढीव बांधकाम अनधिकृत असल्याबाबत मालकाला डहाणू नगरपरिषदेने दिनांक १७.७.२००८ रोजी नोटीस देऊनही वाढीव बांधकाम दूर केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन वाढीव बांधकाम केल्याप्रकरणी नगरसेवकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत संबंधितांना नोटीस देण्यात आली होती. तथापी, सदरचे बांधकाम असलेले भुखंड जागेमधील गाळ्यावरील शेडचा वापर पावसापासून संरक्षण करण्यासाठी करण्यात येत असल्याने सदर जागेवरील वाढीव बांधकाम नियमांकुल ठरविण्यात आले आहे.
नगरपरिषदेने अनधिकृत बांधकामासंदर्भात कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २ मधील खंड (६ क) व कलम ५३ नुसार चौकशी करण्यात आली असून, चौकशीअंती वेदरशेड च्या बांधकामास परवानगी देण्यात आल्याने सदरचे बांधकाम अनधिकृत ठरत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवसदन (मरिन ड्राईव्ह, मुंबई) या जुन्या उपकरप्राप्त इमारत मालकाने महापालिकेने मंजूर केलेल्या परवानगीचा बेकायदा वापर केल्याबाबत**

**(२३) ५३७१९ (२६-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील, मरिन ड्राईव्ह, सी.रोड येथील शिवसदन या जुन्या उपकरप्राप्त इमारतीच्या ६ व्या मजल्याच्या टेरेसवर ४० टन पाण्याच्या टाकीचे आधीच वजन असताना, इमारत मालकाने १ सदनिका, बाथरुम व किचन बांधुन महापालिकेने दिनांक ०८ मार्च, १९६७ साली मंजूर केलेल्या परवानगीचा बेकायदा वापर केला आहे. तसेच १९८० ते २००१ या कालावधीत परवानगी व्यतिरिक्त १२ सदनिकांचे अनधिकृत बांधकाम केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०८ मार्च, १९६७ रोजी मुंबई महापालिकेने मंजूर केलेल्या परवानगीचा वैधता कालावधी काय आहे, तसेच परवानगी मध्ये नमूद केलल्या बांधकामा व्यतिरिक्त मालकाने परस्पर केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत महापालिकेने दिनांक १६ जुन, २००१ व त्यानंतर दिनांक १० मे, २०१२ रोजी कलम ३५४ अंतर्गत मालकास नोटीस पाठवूनही सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मा. मुख्यमंत्री व मा. आयुक्त महापालिका यांना सन २०१२ ते २०१५ दरम्यान अनेक लोकप्रतिनिधींनी कागदोपत्री सबळ पुराव्यासह लेखी तक्रार देवूनही अद्याप शासन तथा महापालिकेने अनिधिकृत बांधकामावर कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१७) :**(१) मरील ड्राईव्ह येथील शिवसदन इमारत तळ मजला + ६ मजले अशी असून, सदर इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील दक्षिण पूर्व भागात असलेल्या मोकळ्या टेरेसवर अंदाजे ५००० लिटर क्षमतेच्या कूण ७ टाक्या असून, सदर पाण्याच्या टाक्यांचे एकूण वजन हे अंदाजे ३५ टन आहे.

याबाबत सदर इमारतीच्या मालकाला मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४८८ नुसार दिनांक १०.०५.२०१२ रोजी स्थळ निरीक्षणाकरीता नोटीस बजावण्यात आली होती.

सदर इमारतीबाबतची सन १९६७ मधील नस्ती महानगरपालिकेकडे उपलब्ध नसून, महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागामध्ये उपलब्ध असलेल्या नकाशा नोंदवहीत सदर इमारतीवर अतिरिक्त ६ वा मजला बांधण्यंकरीता इमारतीच्या मालकास दिनांक ०८.०३.१९६७ रोजी मंजुरी दिली असल्याचे दिसून येते. त्यामुळे, इमारत मालकाने सादर केलेल्या मंजूर नकाशाच्या आधारे स्थळपाहणी केली असता, इमारतीचे बांधकाम इमारत मालकाने सादर केलेल्या मंजूर नकाशाप्रमाणे केले असल्याचे आढळून आले व सदर प्रस्तावित बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ ४४८.१८ चौ.मी. इतके असल्याचे सदर नकाशात नमूद केलेले आहे.

तसेच, सदर इमारतीच्या मालमत्ताकरासाठी प्रथम करनिर्धारण सन १९६१-६२ पूर्वीपासून असल्याचे व सन १९७६-७७ पासून सदर इमारत तळमजला + ६ मजले अशी करनिर्धारीत असल्याचे उपलब्ध अभिलेखानुसार दिसून येते. तथापि, ६ व्या मजल्यावरील परिवास्तूत वेळोवेळी जे बदल करण्यात आले त्याचे करनिर्धारण सन १९७६-७७ ते सन २००९-१० या कालावधीच्या निरीक्षण उताऱ्यांमध्ये करण्यात आलेले आहे.

सदर इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील अतिरिक्त बांधकाम/फेरफार/दुरुस्तीसंबंधी सदर इमारतीतील रहिवाशांनी इमारत मालक, बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्विकास यांच्याविरुध्द मुंबई शहर व नगर दिवाणी न्यायालयात क्रमांक ४०११/२००१ अन्वये खटला दाखल केला होता. मा.न्यायालयाने सदर इमारतीतील सदनिका क्र.१८ व १८-ए अस्तित्वात असल्याचे व इमारत मालकाने अनधिकृत बांधकाम केले नसल्याचे त्यांच्या आदेशात नमूद केले आहे.

(२) व (३) सदर इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील सदनिकेतील अंतर्गत फेरफारप्रकरणी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ अ अन्वये नोटीस बजावून सदर अनधिकृत बांधकाम दिनांक २६.०७.२००१ रोजी महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले आहे.

---

## मुंबई शहर व उपनगरात १० लाख घरे बांधण्याबाबत

**(२४) ५३७२३ (२६-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात १० लाख घरे बांधण्यासाठी शासनाने मुंबई २०१४-३४ च्या विकास आराखडयात आरे वसाहत ना विकासक्षेत्र आणि मिठागराच्या राखीव जमिनी आरक्षण मुक्त करण्याचे प्रस्तावित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे वसाहतीच्या काही जागेत मेट्रो कारशेड आणि गिरगाव येथील जुन्या इमारतींची जागा मेट्रोसाठी देण्याबाबत विकास आराखडयात तरतुद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शासनाने सदरहू प्रस्तावित विकास आराखडयात राखीव व मोकळया जागा नष्ट न करता मुंबईकर जनतेच्या राहणीमानास व पर्यावरणास धोका निर्माण होवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने पुनप्रसिध्द केलेल्या सुधारित प्रारुप विकास योजना अहवालामध्ये ना विकास क्षेत्रामधील ३००० हेक्टर जागा ना विकास क्षेत्रासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीनुसार उपलब्ध होवू शकेल असे प्रस्तावित करणेत आलेले आहे. तथापि, त्याकरिता भूखंड क्षेत्राची अट किमान ४.०० हेक्टर इतकी प्रस्तावित करणेत आलेली आहे. तसेच त्यामधील २५ टक्के जागा सार्वजनिक मोकळ्या जागा म्हणून तसेच संस्थात्मक क्षेत्र ८ टक्के, सामाजिक सुविधा क्षेत्र ८ टक्के, सर्वसमावेशक गृहनिर्माणासाठी २५ टक्के व जमीन मालकास विकासासाठी ३४ टक्के या प्रमाणे विकास करण्याबाबत बंधनात्मक तरतूदी प्रस्तावित करणेत आलेल्या आहेत. सबब ३००० हेक्टर जमीन आरक्षणमुक्त राहिल असे पूर्णत: प्रस्तावित नाही.

(२) आरे वसाहतीमध्ये ३४.४१ हेक्टर क्षेत्र हे मेट्रो कार शेडसाठी आरक्षित करण्यात आले आहे. तसेच लगतच्या रॉयल पाल्मच्या जमिनीवरील ८९.३२ हेक्टर क्षेत्रसुध्दा मेट्रो कार शेडसाठी आरक्षित केले आहे.
(३) सदरचा आराखडा हा प्रारुप आराखडा असून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी प्रसिध्द करणेत आलेला आहे. प्राप्त सूचना/हरकती विचारात घेवून वैधानिक कार्यवाही पूर्ण होवून आराखडा महानगरपालिकेकडून शासनाचे मान्यतेसाठी सादर झाल्यानंतर गुणवत्तेनुसार या प्रकरणी शासनाकडून अंतिम निर्णय संकल्पित रहाणार आहे.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत आरक्षित भूखंडावर अवैध बांधकाम होत असल्याबाबत**

**(२५) ५५०११ (२९-०८-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर, महापालिका हद्दीतील आरक्षित भूखंडांवर बहुमजली २०० बांधकामे अवैध सुरु असल्याबाबतची माहीती नगरसेवकांनी महानगरपालिका प्रशासनास माहे मे, २०१६ दरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अवैध बांधकामांमुळे भविष्यात अपघात घडून फार मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याची शक्यताही महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अवैध बांधकामांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात काही ठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरु असल्याबाबतच्या तक्रारी माहे मे, २०१६ मध्ये महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाल्या होत्या.

तसेच काही ठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे पदनिर्देशित अधिकारी व बीट मुकादम यांच्या पाहणीतून निदर्शनास आले आहे.
(३) व (४) सदर अवैध बांधकामांविरुध्द महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-

- महापालिका कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक/धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करण्यात आले असून, अतिधोकादायक इमारतींवर निष्कासनाची कारवाई सुरु आहे.
- माहे मे व जून २०१६ मध्ये महानगरपालिकेच्या चार प्रभाग समिती क्षेत्रांमधील एकूण ४० अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.
- तसेच, ६ अनधिकृत बांधकामधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

---

**भामा आसखेड धरणातील शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न व खेड, शिरुर व हवेली, दौंड, तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील प्रकल्पासाठी राखीव असे शेरे काढण्याबाबत**

**(२६) ५६२९९ (२२-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पुणे शहराच्या पूर्व भागासाठी राबविण्यात येत असलेल्या भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेचे काम ८ महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी कैंद्राकडून ३८० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मार्च २०१७ अखेर हे काम पूर्ण न झाल्यास ३८० कोटी रुपयांचा निधी परत कैंद्राकडे जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भामा आसखेड धरणातील शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न व लाभ क्षेत्रातील जमिनी कमी झालेल्या खेड, शिरुर व हवेली, दौंड, तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील प्रकल्पासाठी राखीव असे शेरे काढण्यासंदर्भात अद्याप कुठलीही कार्यवाही करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करुन खेड, शिरुर व हवेली, दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील प्रकल्पासाठी राखीव असे शेरे काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) * सदर योजनेचे काम डिसेंबर, २०१७ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- तथापि, जॅकवेलपासून ६.०० कि.मी. लांबीचे अशुध्द जलवाहिनीचे काम प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे बंद आहे.
- त्याअनुषंगाने भामा आसखेड प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी पुणे शहरास भामा-आसखेड उद्भवावरुन मंजूर पाणी पुरवठा प्रकल्पामधून कुरळी येथून Tapping देऊन ५ MLD पाणी (Raw Water) आळंदी नगरपरिषदेस उपलबध करुन देणेबाबतच्या सूचना आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.
- सदर प्रकल्पास विरोध करणाऱ्या आंदोलकांना ही वस्तुस्थिती कळवून हे आंदोलन मागे घेण्याबाबत व भामा-आसखेड उद्भवावरुन सुरु असलेल्या प्रकल्पाचे काम युध्द पातळीवर पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करणेबाबत सूचना पुणे महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४), (५) व (६) भामा आसखेड प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील काही गावांमधील क्षेत्र वगळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी पुणे यांचेकडून दिनांक ४.४.२०१६ रोजी विभागीय आयुक्त, पुणे यांना पाठविण्यात आला असून त्यावर विभागीय आयुक्त, पुणे यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

___________

## औरंगाबाद शहरातील विविध विकास कामांबाबत

**(२७) ५६८९३ (२६-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो सिटीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या औरंगाबाद शहरातील विविध विकास कामांचे प्रस्ताव औरंगाबाद महानगरपालिकेने तसेच पर्यटन विकास महामंडळाने शासनाकडे मंजूरीसाठी पाठविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने किती प्रस्ताव सादर केले आहे, त्या प्रस्तावापैकी म्हेसमाळ, खुलताबाद प्राधिकरण, पाणचक्री-मकबरा पर्यटन स्थळांचा विकास, नहर-ए-अंबरी या ऐतिहासिक पाणी पुरवठा योजनेचे जतन, शहरातील ऐतिहासीक दरवाज्यावजळील जीर्ण झालेल्या पूलासाठी नवीन उड्डाणपुल बांधणे अशा विविध विकास कामांसाठी आतापर्यंत किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(३) तसेच, प्रस्ताव मंजूर झाले असल्यास सदर कामे किती दिवसात पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :**(१) व (२) होय.

औरंगाबाद महानगरपालिका व पर्यटन विभागाने विविध विकास कामाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

अ) म्हैसमाळ, खुलताबाद, वेरुळ, सुलिभंजन या पर्यटन स्थळांसाठी रु.४३५.९२ लक्षचा विकास आराखडा जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी पर्यटन विभागास सादर केला असून तो उच्चस्तरीय समितीस सादर करण्यात आला आहे.

ब) औरंगाबाद मेगा सर्किटचा विकास करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने पाणचक्की, टॅक्सी स्टॅड, रस्ता सौंदर्यीकरण, रोझ गार्डन, बिबिका मकबरा, नगरखाना गेट, दौलताबाद किल्ला, बनी बेगम बाग येथील रु.२३.४३ कोटीच्या कामांना मंजुरी दिली असून रु.४.६८ कोटी वितरीत केले आहेत. तर राज्य शासनाने रु.३.३३ कोटी वितरीत केले आहेत. सद्यस्थितीत केंद्र शासनाने सदर योजना बंद केलेली आहे. केंद्र शासनाकडून पुढील निधी प्राप्त न झाल्यामुळे सन २०१५-१६ मध्ये राज्य शासनाने (पर्यटन विभाग) रु.१.५० कोटीचा निधी वितरीत केला आहे.

क) औरंगाबाद शहरातील रस्ता अनुदान व पायाभुत सुविधांसाठी शासनाने (नगर विकास विभाग) औरंगाबाद महानगरपालिकेला सन २०१२-१३ मध्ये रु.३२.३६ कोटी, सन २०१३-१४ मध्ये रु.३.२७ कोटी, सन २०१४-१५ मध्ये रु. १.२५ कोटी व सन २०१५-१६ मध्ये रु.१३.०० कोटी असा एकूण रु.४९.८८ कोटी निधी वितरीत केला आहे.

(३) सदरील ऐतिहासिक पूलांची अवस्था पाहता व वाहतुकीची निकड पाहता पूलांचे संरचनात्मक सर्वेक्षण (Structural Audit) कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून करुन घेणे संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेकडून कार्यवाही चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नालासोपारा येथील आत्मवल्लभ सोसायटीच्या २३ इमारती अतिधोकादायक स्थितीत असल्याबाबत**

**(२८) ५७६१८ (२६-०८-२०१६). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा (जि.पालघर) येथील आत्मवल्लभ सोसायटीच्या २३ इमारती अतिधोकादायक स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेने सदर रहिवाश्यांसाठी अद्याप राहण्याची पर्यायी व्यवस्था न करता सदर इमारतींना खाली करण्याबाबत नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) याबाबत वसई-विरार महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

i. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे तुळींज येथील २३ इमारतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ (१) (२) (३) (४) अन्वये दिनांक ०६.०४.२०१६ रोजी सदर इमारतींना अतिधोकादायक जाहिर करुन इमारती खाली करुन देणेबाबत नोटीसा देण्यात आल्या आहेत.

ii. महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२०१५ व मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे धोकादायक /मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांना स्थलांतरीत करावयाची जबाबदारी पोलिसांची आहे. त्याअनुषंगाने दिनांक १८.०६.२०१६, दिनांक २९.०६.२०१६ व दिनांक ०१.०७.२०१६ रोजी वसई विरार महानगरपालिकेने तुळींज पोलीस स्थानकास पोलीस बंदोबस्त मिळणेकामी विनंती केली आहे. तथापि, अद्यापपर्यंत पोलीस बंदोबस्त प्राप्त न झाल्यामुळे पुढील कारवाई प्रलंबित आहे.

iii. सदर प्रकरणी जिल्हा न्यायालय, वसई यांचे दिनांक १०.२.२०१४ रोजी इमारत निष्कासन करणेकामी तात्पुरता स्थगिती आदेश आहे.

---

**राज्यातील कोळीवाडे आणि गावठाण्यांमधील घरांच्या विकासासाठी एक ऐवजी चार एफ.एस.आय मिळण्याबाबत**

**(२९) ५८८८६ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई, ठाण्यासह इतर कोळीवाडे आणि गावठाण्यांमधील घरांच्या विकासासाठी एक ऐवजी चार एफ. एस. आय. मिळावा अशी मागणी अध्यक्ष, महाराष्ट्र कोळी समाज संघ यांनी दिनांक ०३ मे, २०१६ रोजी लेखी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) कोळीवाड्यांसाठी चार एफ.एस.आय. मिळावा अशा आशयाचे निवेदन प्राप्त आहे.

(२) व (३) बहुतांश कोळीवाडे हे सीआरझेड क्षेत्रामध्ये येत असल्याने सीआरझेडच्या दिनांक ६.१.२०११ रोजीच्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार त्यांचा विकास अनुज्ञेय आहे. बृहन्मुंबई क्षेत्रातील सीआरझेडने बाधित भागाच्या विकासासाठी विशेषत्त्वाने विचार झालेला असून त्यानुसार विशेष नियम आहेत. इतर भागासाठी असे विशेष नाहीत.

बृहन्मुंबई क्षेत्रासाठी गावठाणांना जे नियम लागू आहेत तेच नियम कोळीवाड्यासाठी लागू केलेले आहेत. यासंदर्भातील अधिसूचना दिनांक ८ मे २०१२ रोजी निर्गमित केलेली आहे. त्यानुसार ९.०० मीटर पेक्षा कमी रुंदीच्या रत्यावरील भूखंडाना १.५ चटई क्षेत्र निर्देशांक व ९.०० मीटर पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावरील भूखंडाना २.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

सीआरझेड तरतूदींचा विचार करता सरसकट ४.०० चटई क्षेत्र निर्देशांकास मान्यता देणे संयुक्तिक होणार नसल्याने त्याबाबत विचार झालेला नाही.

---

## गोवंडी-मानखुर्द परिक्षेत्रातील जुन्या उपकरप्राप्त तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यातील जुन्या मालकी हक्काच्या जमिनींवर उभारण्यात येणाऱ्या घरकुलांसाठी प्रोत्साहानात्मक वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याबाबत

**(३०) ५९३९२ (२९-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई ईशान्यकडील उपनगर जिल्ह्यातील गोवंडी-मानखुर्द परिक्षेत्रातील जुन्या उपकरप्राप्त तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यातील जुन्या मालकी हक्काच्या जमिनींवर तसेच महापालिकेच्या मिळकतींवरील नव्याने उभारण्यात येणाऱ्या घरकुलांसाठी प्रोत्साहानात्मक वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रमाची आखणी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी व सेवाभावी संघटनांच्या प्रतिनिधींनी माहे मे, २०१६ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री (नगरविकास), महापालिका आयुक्त, सहआयुक्त (मुंबई उत्तर-पूर्व उपनगर जिल्हा) तसेच संबधित महापालिका नगररचना अधिकारी, मुंबई महानगर सचिव यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) ते (३) मुंबई बेट शहरामध्ये जुन्या उपकरप्राप्त इमारती आहेत. सदर इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांकाची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आहे. तथापि मुंबई उपनगरामध्ये जुन्या इमारतींसाठी म्हणजे बिगर उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांकाची तरतूद नाही. त्यामुळे याकरिता प्रोत्साहनात्म्क चटई क्षेत्र निर्देशांक द्यावा अशा आशयाच्या मागण्या सातत्याने होत आहे. त्यास अनुसरुन शासनाने उपनगर क्षेत्रातील धोकादायक भाडेकरुव्याप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देणेचा तत्वत: निर्णय घेतलेला आहे. या संदर्भाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील प्रस्तावित फेरबदलाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अेअे) खालील नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणारी सूचना दिनांक २.१.२०१७ रोजी प्रसिध्द केलेली आहे. याबाबत वैधानिक कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून अंतिम निर्णय संकल्पित आहे.

त्याचप्रमाणे धोकादायक इमारतींचा पुनर्विकासासंदर्भात नागरी नूतनीकरण योजनेचे (Cluster Development) जे विनियम मुंबई बेट शहरासाठी लागू आहेत ते मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेवून उपनगरासाठी लागू करणेचा निर्णय घेणेत आलेला असून त्याबाबत मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची कार्यवाही सुरु आहे.

त्याचप्रमाणे जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारती, बिगर उपकरप्राप्त इमारती, बी.आय.टी. इमारती, रेफ्यूजी इमारती, पी.एम.जी. इमारती व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाशी संबंधित इमारती याबाबत स्पष्ट धोरणात्मक निर्णय घेणेसाठी विकास नियंत्रण नियमावली आवश्यक सुधारणांबाबत शासनास शिफारस करण्यासाठी सात विधानसभा व एक विधापरिषद सदस्य असलेली आठ जणांची समिती शासन गृहनिर्माण विभागाकडील दिनांक २९.१०.२०१६ रोजीचे शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचे कामाकाज सुरु झालेले आहे.

---

## मुंबईतील घरांच्या प्रतिक्षेत असणाऱ्या गिरणी कामगारांबाबत

**(३१) ६०५५१ (२९-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत अनेक वर्षापासून घरांच्या प्रतिक्षेत असणाऱ्या गिरणी कामगारांसाठी घरांची योजना राबविण्यासाठी पाच वर्षापुर्वी तत्कालिन शासनाने चार एफ.एस.आय देण्याच्या केलेल्या घोषणेमुळे केवळ २०,००० (वीस हजार) घरे तयार होणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगारांची संख्या विचारात घेवून त्यांचे मुंबईतच पुनवर्सन करण्यासाठी पाच किंवा सहा एफ.एस.आय मिळणे गरजचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुधारीत विकास आराखडयात कोणतीही मागणी नसतांना पचंतारांकित हॉटेल्स व व्यावसायिक क्षेत्रास पाच एफ.एस.आय देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पचंतारांकित हॉटेल्स व व्यावसायिक क्षेत्रास पाच एफ.एस.आय देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, गिरणी कामगारांना पाच एफ.एस.आय. देवून आवश्यक घरे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७)** :(१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ५८ अंतर्गत म्हाडास गिरणी कामगारांच्या गृहबांधणीसाठी प्राप्त होणारी जमीन व अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक विचारात घेता प्रश्नामध्ये उल्लेखिलेप्रमाणे वस्तुस्थिती दिसून येते.
(२) सर्व गिरणी कामगारांना बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये सदनिका देणे शक्य होणार नाही. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील भाडे तत्त्वावरील सदनिकांपैकी सदनिका गिरणी कामगारांसाठी उपलब्ध करुन देणेचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून उपलब्ध झालेल्या २४१७ सदनिकांची सोडत दिनांक २.१२.२०१६ रोजी म्हाडाकडून काढणेत आलेली आहे. भाडे तत्त्वावरील योजनेंतर्गत जे प्रकल्प सुरु आहे त्यामधून गिरणी कामगारांसाठी जवळपास ८५०० इतक्या सदनिका उपलब्ध होवू शकणार आहेत.
(३) ते (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २७.५.२०१६ रोजी सुधारित प्रारुप विकास आराखडा विकास नियंत्रण नियमावलीसह नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी प्रसिध्द केलेला आहे. त्यामध्ये ३००० चौ.मी. वरील भूखंडामध्ये हॉटेलसाठी ५.०० इतका चटई क्षेत्र निर्देशांक प्रिमियम आकारणी करुन प्रस्तावित केलेला आहे. सदर तरतूदी ह्या प्रारुप असून त्यास शासनाने मंजूरी दिलेली नाही.

सुधारित प्रारुप विकास योजनेवर प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकती विचरात घेवून, वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुधारित प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर होणार आहे. सदर प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर झाल्यानंतर शासनाकडून गुंणवत्तेनुसार अंतिम निर्णय संकल्पित आहे.

---

## ताडदेव (मुंबई) येथील पोलीस विभागाच्या जागेबाबत

**(३२) ६५००९ (१६-०१-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताडदेव (मुंबई) येथील मिल कंपाऊंडमधील पोलीस विभागाच्या जागेवरील झोपडपट्टी पुनर्विकासामध्ये एस.डी. कॉर्पोरेशनने चक्क मुंबई पोलिसांनाच फसविले असल्याची धक्कादायक बाब माहिती अधिकाराखाली दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडदेव येथील एमपी मिल कंपाऊंड मधील ०.९५ हेक्टर जमीन पोलीस विभागासाठी राखीव ठेवण्याचे आदेश महसूल व वनविभागाने दिनांक २ फेब्रुवारी, १९८९ रोजी दिले असतानाही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१७-०४-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) व (३) ताडदेव (मुंबई) येथील न.भू.क्र. ७२५ (पै) येथील ४.२६ हेक्टर जमिनीपैकी ३.३१ हेक्टर जागेवर झोपड्यांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने व ०.९५ हेक्टर जागा पोलीस विभागाला देण्याबाबतचे महसूल विभागाचे दि.०२.०२.१९८८ रोजीचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या तरतुदी अंमलात आलेल्या आहेत. त्याच्या तरतूदीनुसार प्रथम झोपडपट्टी पुनर्विकास योजना मे. एस.डी. कॉर्पोरेशन यांच्यामार्फत सादर करण्यात आली होती. सदरहू योजनेस दि.२६.०२.१९९६ रोजी प्रथम आशयपत्र देण्यात आले. विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार सदर आशयपत्रामध्ये पोलीस हौसिंगच्या आरक्षणासाठी २५५५.६० चौ.मी. इतक्या बांधीव क्षेत्राची तरतुद करण्यात आली होती. त्यानंतर सदरहू झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचे रुपांतरण निनियम ३३ (१०) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये करण्यात येवून प्रथम आशयपत्र दि.१४.०१.१९९९ रोजी देण्यात आले होते. त्यावेळी विकास योजना आराखड्यामधील पोलीस हौसिंगसाठी असलेल्या आरक्षणानुसार बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ३३ (१०) मधील परिशिष्ट-४ खंडीका ७.५ च्या तरतुदीनुसार २५% म्हणजेच ३०२५.७५ चौ.मी. इतके बांधीव क्षेत्र पोलीस हौसिंगसाठी स्वतंत्र इमारतीत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील गावठाण व मूळ गावठाणातील प्रकल्पग्रस्तांनी केलेली बांधकामे नियमित करणेबाबत

**(३३) ६५१०३ (१६-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांनी मूळ गावठाण व गावठाणालगत केलेल्या बांधकामांसाठी शासनाने जाहीर केलेली क्लस्टर डेव्हलपमेंट योजना कार्यान्वित करण्यापूर्वी आघात मूल्यमापन अहवाल न्यायालयास सादर करण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महापालिकेने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये व सिडकोने माहे मार्च, २०१६ मध्ये आघात मूल्यमापन अहवाल शासनाकडे सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील सर्व बाबींची पूर्तता करून शक्य तितक्या लवकर सिव्हील अप्लीकेशन, नोटीस ऑफ मोशन मा. उच्च न्यायालयात दाखल करावे अशा सूचना शासनाने संबंधिताना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंतिम अधिसूचना काढण्यापूर्वी नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या कृती समितीच्या मागण्या विचारात घेऊन त्यांचा समावेश क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेमध्ये केल्यानंतरच अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात यावी असे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१६ मध्ये दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७)** :(१) नागरी नुतनी करण योजनेसंदर्भात (Cluster Development) आघात मूल्यमापन अहवाल तयार करुन त्याचा परामर्ष घेणे आवश्यक आहे, त्या शिवाय शासनाने अंतिम अधिसूचना निर्गमित करु नये असे मा.उच्च न्यायालयाचे अंतरिम आदेश आहेत.

(२) नवी मुंबई व सिडकोने तयार केलेले आघात मूल्यमापन अहवाल शासनास प्राप्त झालेले आहेत.

(३) होय.

(४) व (५) या संदर्भात लोकप्रतिनिधींचे दिनांक १५/१०/२०१५ व दिनांक १०.१०.२०१६ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

प्रस्तूत प्रकरणी गावठाण व विस्तारीत गावठाण क्षेत्रामध्ये स्थानिक नागरिकांना गरजेपोटी बांधलेल्या घरांचा पुर्नविकास नागरी नुतनीकरण योजनेअंतर्गत (Cluster Development) करणेसाठीच्या तरतुदी सिडकोच्या तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणेसाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये फेरबदल प्रस्तावित करणेचा निर्णय घेतलेला आहे. याबाबत नागरिकाच्या सूचना / हरकती मागविणारी सूचना दि.४/०३/२०१४ रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती. त्यावर प्राप्त झालेल्या सूचना हरकतींचा विचार झालेला आहे. मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेवून याबाबत अंतिम अधिसूचना निर्गमित करावी अस निर्णय शासनाने ऑगस्ट २०१६ मध्ये घेतलेला आहे. न्यायालयीन अनुमती/निर्णयानुसार पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

---

## मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत

**(३४) ६५१४० (१६-०१-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दिड लाख गिरणी कामगारांपैकी भविष्यात केवळ ३० हजार गिरणी कामगारांना २७ गिरण्यांच्या भूखंडावरील योजनातून घरे मिळतील, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल येथील १३ हजार घरे गिरणी कामगारांना देण्याबाबतही शासन दुर्लक्ष करीत असल्याची बाब दिनांक१८ ऑक्टोबर, २०१६ रोजी गिरणी कामगारांनी मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत शासनाने कोणतीही योजना तयार केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गिरणी कामगारांना तातडीने घरे देण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०४-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत एकूण ५८ बंद/आजारी गिरण्या आहेत. बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ५८ (१) (ब) मध्ये गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटईक्षेत्र याचा १/३ हिस्सा म्हाडास गिरणी कामगारांसाठी घरे व संक्रमण सदनिका यांच्यासाठी देण्याची तरतूद आहे. त्यानुसार ५८ पैकी ३७ गिरण्यांमध्ये म्हाडाचा वाटा निश्चित झालेला आहे. म्हाडाचा वाटा निश्चित झालेल्या १६.१४ हेक्टर जमिनींवर गिरणी कामगारांसाठी १६५०० सदनिका, ८१०० संक्रमण सदनिका अशा एकूण २४६०० सदनिका बांधणे शक्य आहे, असा अहवाल म्हाझने दिलेला आहे.

(२) शासनाच्या नगर विकास विभागाने महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना त्यांच्या दि.०४.०३.२०१६ च्या पत्रान्वये सदर प्रधिकरणाकडील प्रत्येकी १६० चौ.फुटाच्या दोन सदनिकांचे एकत्रिकरण करुन एकंदर १०,७६८ सदनिका गिरणी कामगारांसाठी उपलबध करुन द्याव्यात, असे कळविले आहे. त्यापैकी कोन, पनवेल येथील २४१७ सदनिकांची सोडत दि.०२.१२.२०१६ रोजी म्हाडामार्फत काढण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही. मुंबई तील कापड गिरणी कामगारांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता वस्त्रोद्योग विभागाकडून समन्वय करण्यात येतो. वस्त्रोद्योग विभागाकडून प्राप्त माहितीनुसार गिरणी कामगार वारस उत्कर्ष संघ, मुंबई यांनी उर्वरित गिरणी कामगारांकरिता घरे देण्याबाबत शासनास दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, वस्त्रोद्योग यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०.०८.२०१६ रोजी बैठक घेण्यात आली आहे.

(४) म्हाडाकडे उपलबध झालेल्या ३२ गिरण्यांच्या जमिनीपकी प्रथम टप्प्यामध्ये १८ गिरण्यांच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या ६९२५ सदनिकांसाठी त्या गिरण्यांच्या कामगारांकरिता दि.२८.०६.२०१२ रोजी सोडत काढण्यांत आली आहे.

तसेच दुसऱ्या अप्प्यात ०६ गिरण्यांच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या २६३४ सदनिकांसाठी दि.०९.०५.२०१६ रोजी सोडत काढण्यांत आलेली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी मौजे कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथे बांधलेल्या (१६० चौ.फु. + १६० = ३२० चौ. फु.) एकुण २४१७ सदनिकांची दि.०२.१२.२०१६ रोजी म्हाडामार्फत संगणकीय सोडत रंगशारदा सभागृह, वांद्रे (पश्चिम) मुंबई - ५२ येथे काढण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईच्या नवीन विकास आराखड्याबाबत

**(३५) ६५२५५ (१६-०१-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या नवीन विकास आराखड्याबाबत नागरिकांकडून तब्बल ८४,७६७ हरकती आणि सूचना महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्या असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्यावर नागरिकांकडून मागविण्यात आलेल्या हरकती आणि सुचनांच्या सुनावणीसाठी शासनाने समिती नियुक्त केलेल्या समितीस विकास आराखड्याबाबत निर्णय घेण्यास किती कालावधी लागणे अपेक्षीत आहे,
(३) असल्यास, सदरहू नवीन विकास आराखड्यात १८९ गावठाणापैकी ५२ गावठाणे आणि ३८ कोळीवाड्यापैकी २२ कोळीवाडे दाखविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर आराखड्यातील चुकींची चौकशी केली आहे काय;
(५) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर आराखडा अचूक तयार करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुधारित प्रारुप विकास आराखडा प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीसह दिनांक २७.५.२०१६ रोजी प्रसिध्द करणेत आलेला असून ६० दिवसांच्या मुदतीमध्ये नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणेत आलेल्या होत्या.

बृहनमुंबई महानगरपालिकेकडे ७२,४८२ अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी ५९,८४९ अर्ज गठ्ठयांच्या स्वरुपात असलेचे आढळून आलेले आहे.
(२) नियोजन समितीने सुनावणी घेणेचे काम दिनांक १५.१२.२०१६ रोजी पूर्ण केलेले असून नियोजन समितीचा अहवाल /शिफारशी तयार करण्याचे काम सुरु आहे.
(३) ते (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून महसूली भूमि अभिलेखाप्रमाणे असलेली गावठाणे व कोळीवाडे सुधारित प्रारुप विकास आराखड्यामध्ये दर्शविणेत आलेले आहेत. महसूल अभिलेखामध्ये कोळीवाड्यांच्या प्रचलित नोंदी नाहीत.

बृहन्मुंबई क्षेत्रातील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष निरिक्षण करुन सिमांकन करण्यासाठी अनुसरावी लागणारी कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी महसूल व वन विभागाच्या दिनांक १९/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने अहवालही सादर केलेला होता. त्यांनी निश्चित केलेली कोळीवाड्यांची संख्या व केंद्र शासनाच्या कृषि व पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिपत्याखाली केंद्रीय सागरी मत्स्यकी संशोधन संस्था, कोची (भारतीय कृषि अनुसंधान परिषद) यांनी केलेल्या महाराष्ट्र राज्याच्या सागरी जनगणना सन २०१० च्या सर्वेक्षणामध्ये, मुंबई शहर व मुंबई उपनगरातील कोळीवाड्यांची दर्शविलेली संख्या यामध्ये विसंगती आलेने संयुक्त स्थळनिरीक्षण करुन कोळीवाड्यांची संख्या अंतिमत: निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सुधारित प्रारुप विकास आराखडा महानगरपालिकेच्या मंजूरीसापेक्ष राज्य शासनाकडे मंजूरीसाठी सादर करणेत येणार आहे. सर्व कोळीवाड्यंच्या नोंदी सुधारित प्रारुप विकास योजनेमध्ये अंतर्भूत करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून कोळीवाडे व गावठाणे यासंदर्भात प्राप्त झालेल्या सूचना/हरकती शासनाकडून विशेषत्वाने विचारात घेणेत येवून आराखड्यास मंजूरी देणेची कार्यवाही संकल्पित आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेत काम करणा-या महिला कर्मचा-यांवर होत असलेला लैंगिक अत्याचार**

**(३६) ६५२८९ (१६-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत यावर्षी महिला कर्मचा-यांवरील लैंगिक अत्याचाराच्या २९ तक्रारी प्राप्त झाल्या असून मागील ४ वर्षात लैंगिक अत्याचाराच्या ११८ तक्रारी महानगरपालिका प्रशासनाकडे दाखल झाल्या असल्याचे माहितीच्या अधिकारान्वये दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लैंगिक अत्याचार करणा-यांची चौकशी करण्यात आली असून त्यांच्यावर कोणती कारवाई केली याबाबतची माहिती देण्यास महानगरपालिका प्रशासन टाळाटाळ करीत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेतील महिला कर्मचा-यांवर होत असलेल्या लैंगिक अत्याचारावर आळा घालण्याची आवश्यकता असतानाही महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) लैंगिक अत्याचारावर आळा घालण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

- लैंगिक छळाच्या तक्रारींची दखल घेऊन कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१३ अन्वये तक्रार समितीकडून त्याचे निराकरण करण्यात येते.
- कायद्याप्रमाणे व महानगरपालिका सेवा नियमावलीप्रमाणे शिक्षेची शिफारस करण्यात येते.
- प्रत्येक वर्षी त्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात येतो.
- शासनाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीची भेट व बैठकीत सदर अहवाल सादर करुन त्यावर चर्चा करण्यात येते.

---

**मुंबईतील बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासाबाबत**

**(३७) ६५३५८ (१६-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी),**

**श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बी.डी.डी. चाळ रहिवाशांना ५०० चौरस फुटांची घरे मिळणार यासंदर्भात विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) मध्ये 'ब' या नव्या उपनियमावलीचा समावेश करण्यात आला असून त्यास मा. मुख्यमंत्री महोदयांनी मंजुरी दिली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी.डी.डी. चाळ रहिवाशांना अतिरिक्त क्षेत्रफळासाठी बांधकाम खर्च न भरता ५०० चौरस फुटांचे घर देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बी.डी.डी चाळींच्या पुनर्विकासातून उपलब्ध होणाऱ्या घरांपैकी किती टक्के घरे मध्यम उत्पन्न, उच्च उत्पन्न गटांसाठी आरक्षित ठेवण्यात येणार आहेत, तसेच इमारतींच्या पुनर्विकासातील व्यावसायीक गाळ्यांचे पुनर्वसन करण्याबाबतच्या योजनेचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदर पुनर्वसनाच्या कामास कधी सुरुवात करण्यात येणार आहे तसेच या पुनर्विकासाकरीता किती विकासकांची नेमणूक करण्यात आली आहे,

(५) असल्यास, याबाबत रहिवाश्यांबरोबर तसेच त्यांच्या संघटनाबरोबर चर्चा करण्यात आली आहे काय तसेच काम सुरु केल्यानंतर या रहिवाशांच्या राहण्याबाबत कोणती व्यवस्था केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०५-२०१७) :**(१) होय.

याबाबत विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर फेरबदलाची अधिसूचना दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे.

(२) होय.

बी.डी.डी. चाळीमधील पात्र रहिवाश्यांना ५०० चौरस फुट चटई क्षेत्र असलेली सदनिका विना मोबदला मालकी तत्वावर मिळणार आहे.

(३) चाळींच्या पुनर्विकासामधून उपलब्ध होणाऱ्या विक्री घटकाखालील क्षेत्रामध्ये ६०% मध्यम उत्पन्न गट व ३०% उच्च उत्पन्न गट व १०% व्यापारी गाळे असे प्रमाण म्हाडाकडून प्रस्तावित आहे. बी.डी.डी. चाळींच्या मंजूर करणेत आलेल्या विनियमानुसार निवासी व्यतिरिक्त गाळ्यांसाठी विद्यमान चटई क्षेत्राइतके क्षेत्र पुनर्वसनाच्या इमारतीमध्ये अनुज्ञेय राहणार आहे.

(४) पुनर्विकासाचे कामासाठी म्हाडाकडून विकासकाची नेमणूक करण्यात येणार नसून बांधकाम ठेकेदाराची नेमणूक करण्यात येणार आहे. त्याकरिता ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल व नायगांव येथील प्रकल्पासाठी म्हाडाकडून दिनांक २८.१२.२०१६ रोजी निविदा मागविणे आलेल्या असून पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

(५) यांसदर्भात म्हाडाकडून रहिवाश्यांबरोबर बैठका पार पडलेल्या आहेत. बांधकामास सुरुवात झालेनंतर आवश्यकतेनुसार पात्र रहिवाशांची राहण्याची व्यवस्था म्हाडाच्या संक्रमण शिबिरामध्ये करणेत येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील गावांना गावठाणचा दर्जा देणेबाबत**

**(३८) ६५४९७ (१६-०१-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषदेच्या हद्दीतील जांभिवली,ठाकूरपाडा, फणसीपाडा, चिखलोली, कानसई, खुंटवली पाडा, हाल्याचा पाडा, वांद्रापाडा, मोरिवली पाडा, अंबरनाथ पाडा, अंबरनाथ गाव व पालेगाव इत्यादी गावांना गावठाण दर्जा सन २००८ पासून अद्यापही देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावठाणचा दर्जा प्राप्त न झाल्यामुळे तेथील रहिवाशांना पुनर्वसन, विकास, रस्ते, गटारे इत्यादी सुविधा नसल्यामुळे या गावांना गावठाण दर्जा देण्याची मागणी अंबरनाथ येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१७) :**(१) अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर व परिसर अधिसुचित क्षेत्राची विकास योजना शासनाने दि. २५/७/२००८ च्या अधिसूचनेन्वये भागश: मंजूर केली असुन, वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना (ई.पी.) शासनाने दि. ११/८/२००८ च्या अधिसुचनेद्वारे मंजूर केली आहे. सदरची प्रारुप विकास योजना त्यावेळच्या भूमि अभिलेख/गाव नकाशानुसार तयार करण्यात आली असुन, गाव नकाशामध्ये गावठाण दर्शविलेले नसल्याने विकास योजनेमध्ये सदरचे क्षेत्र गावठाण/दाटीवाटीचे क्षेत्र म्हणून दर्शविण्यात आलेले नाही. उक्त पैकी कोहोज-खुंटवली, ता. अंबरनाथ येथील हाल्याचा पाडा, सिसनं. ४९६५ ते ४९६८, ७०१४ ते ७०४५ या जमिनी गावठाणात समाविष्ट करण्याचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनास मंजूरीकरिता सादर केला असून, सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(२) होय.
(३) मा.लोकप्रतिनिधी यांच्या उक्त पत्रावर संबंधितांचे अभिप्राय/अहवाल मागविण्यात आले आहेत. संबंधितांचे अभिप्राय/अहवाल प्राप्त झाल्यानंतर या विषयी उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेमधील अंगणवाडी पोषण आहार योजनेबाबत**

**(३९) ६६२४७ (१६-०१-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये अंगणवाडी पोषण आहार योजने अंतर्गत २१० अंगणवाडीत शिकणाऱ्या ५७६६ बालकांसाठी दिवसाला २५ ग्रॅमचा एक केक स्लाईस हा पूरक पोषण आहार म्हणून वाटपासाठी पावणेतीन कोटी रुपयांचे कंत्राट तयार करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील केक हा मैद्याचा असल्यामुळे बालकांना पचण्यास जड असल्याबाबत हरकती महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निविदाप्रक्रियेत भाग घेतलेल्या सागर फुड्स या कंपनीच्या केकला अन्न व औषध विभागाच्या तपासणीमध्ये बुरशी असल्याचे निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बुरशीयुक्त केकमुळे बालकांच्या आरोग्यास असलेला धोका लक्षात घेऊन शासनास अहवाल पाठवण्यात आला होता काय,

(५) असल्यास, शासनस्तरावरून उक्त कंपनीविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) उल्हासनर महानरपालिकेमध्ये अंगणवाडी पोषण आहार योजनेंतर्गत २१० अंगणवाडी शिकणाऱ्या ५७६६ बालकांसाठी दिवसाला २५ ग्रॅमचा एक केक स्लाईस हा पूरक पोषण आहार म्हणून वाटपासाठी एक कोटी रुपयांचे कंत्राट तयार करण्यात आलेले होते.

(२) सदर निविदा रद्द करणेबाबत एका राजकीय पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्ष यांचे दिनांक १७.०९.२०१६ रोजी पत्र प्राप्त झाले आहे.

(३) निविदेतील अटीनुसार, निविदाधारकांनी जमा केलेले नमुने अन्न, औषध विभागाची मान्यता असलेल्या मायक्रोकेस सिल्लीकर प्रा.लि. प्रयोगशाळेत तपासणीकरिता पाठविण्यात आले होते.

सदर प्रयोगशाळेमार्फत प्राप्त नमुने निविदेत दिलेल्या तपशीलानुसार असल्याचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर निविदेबाबतची पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित होते.

परंतु, सागर फुड्स या कंपनीचे जमा करण्यात आलेले केकचे नमुने उपरोक्त प्रयोगशाळेमार्फत सदोष असल्याने ते प्रमाणित करण्यात आलेले नाहीत.

(४), (५) व (६) सदर अंगणवाडी पोषण आहार योजनेतील केक स्लाईसबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नाही.

त्यामुळे सदर कंपनीविरोधात महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे रुग्णालयाची आवश्यकता तसेच कामगा र रुग्णालयाचे हस्तांतरण करण्याबाबत**

**(४०) ६६३४७ (१६-०१-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील महानगरपालिका रुग्णालयाकरिता जागा निश्चित असूनही रुग्णालयाचा प्रस्ताव दीर्घ कालावधीपासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसंख्येच्या घनतेच्या दृष्टीने देशातील पहिल्या क्रमांकावर येऊ पाहणाऱ्या उल्हासनगर शहरातील जनतेस आरोग्य सेवेकरिता मध्यवर्ती रुग्णालय, आरोग्यकेंद्रे व खाजगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत असल्याने कामगार रुग्णालयही महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी नगरसेवकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार रुग्णालयामधील अपूर्ण कर्मचारी वृंद व इमारत दुरुस्ती अभावी रुग्णालयाची अवस्था बिकट झाली असल्याचे माहे मार्च, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वत:चे कोणतेही रुग्णालय नसून, याबाबत कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आलेला नाही.

(२) याबाबत कोणताही प्रस्ताव अथवा पत्र महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

(३) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उल्हासनगर-३ येथे २०० खाटांचे मध्यवर्ती रुगणालय व १०० खाटांचे राज्य कामगार विमा योजना रुग्णालय तसेच, उल्हासनगर-४ येथे ६० खाटांचे शासकीय प्रसुतीगृह व दवाखाना असून, या रुग्णालयांमार्फत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत जमीन मिळण्याबाबत**

**(४१) ६६७९९ (१६-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) येथे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरासाठी जागा मागणीची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील झोपडपट्टी धारकांना अन्यत्र जागा देऊन उतारे देणे बंधनकारक असताना त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०५-२०१७) :**(१), (२), (३) व (४) मा.पंतप्रधान, भारत सरकार यांनी जून, २०१५ मध्ये सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची घोषणा केली आहे. या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मंत्रिपरिषदेच्या मान्यतेने दि.९.१२.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार ५१ शहराचा समावेश करण्यात आला. तद्नंतर केंद्र शासनाने दि.३.८.२०१६ च्या पत्रान्वये नव्याने ९१ शहरांचा समावेश करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार सदर योजना राज्यात १४२ शहरात खालील ४ घटकात राबविण्यात येत आहे.

१) जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करुन त्यावरील झोपडपट्ट्यांचा आहे तेथेच पुर्नविकास करणे.

२) कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून EWS व LIG घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.

३) खाजगी भागीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.

४) आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान.

उपरोक्त घटक क्र. २ वगळता प्रति घरकुलांमागे लाभार्थ्यास केंद्र शासन हिस्सा रु.१.५ लाख व राज्य शासन हिस्सा रु.१ लाख अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी व जास्तीत जास्त लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेणे सुलभ व्हावे. याद्दष्टीकोनातून अंमलबजावणी यंत्रणांना शासकीय जमीन सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत महसूल व वन विभागाने दि.१९ सप्टेंबर, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. तथापि, सदर योजनेत नेवासा नगरपालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला नाही.

---

## उल्हासनगर येथील डॉ.आंबेडकर स्मारकाचा स्लॅब कोसळल्याबाबत

**(४२) ६६८७१ (१६-०१-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील डॉ. आंबेडकर स्मारकाचा स्लॅब कोसळल्याचे दिनांक ३० जुन, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराकडून निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाल्यामुळे सदर स्लॅब कोसळला असल्यामुळे संबंधित ठेकेदार व उल्हासनगर महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी आंबेडकरी अनुयायांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी उल्हासनगर महापालिका प्रशासनाकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मे. वनीदेवी मजुर कामगार सहकारी संस्था या एजन्सीने महानगरपालिका कार्यालयातील कोणत्याही अधिकाऱ्याची परवानगी न घेता डॉ.आंबेडकर स्मारकाचे काम सुरु केले होते. सादर काम करतांना आर.सी.सी. कॉलम व स्लॅबचे काम सुरु असतांना दिनांक ३०.०६.२०१६ रोजी सदर स्लॅब कोसळला.

तथापि, महानगरपालिकेने त्याच दिवशी संबंधित एजन्सीला नोटीस बजावून २४ तासांत खुलासा मागितला असता, संबंधित एजन्सीकडून कोणताही प्रतिसाद आला नाही.

त्यामुळे मे. वनीदेवी मजुर कामगार सहकारी संस्था या एजन्सीवर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर-१ येथील पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर महापालिकेने निवेदिविना रस्त्यावरील खड्डे बुजविण्याकरिता कोटयावधीचा खर्च केल्याबाबत

**(४३) ६६९०१ (१६-०१-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर महापालिकेने आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामाच्या २ कोटी ८ लाख रु. खर्चास तब्बल १ वर्षानंतर दिनांक १३ मार्च, २०१६ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठीकीत मंजुरी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक वर्ष सन २०१५-१६ च्या खड्डे भरण्याच्या कामाकरिता रु. ८९ लाख ८६ हजार एवढ्या रक्कमेचीच तरतूद करण्यात आली असुन वाढीव काम संबंधित कंत्राटदराने विना निविदा केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी पत्र देऊन कार्यवाही करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्षेत्र क्र. ३ मधील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामाकरिता रितसर निविदा प्रक्रिया करुन निम्नदराने मे. झा. पी. ॲण्ड कंपनी या एजन्सीला महानगरपालिकेमार्फत कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले.

सदर एजन्सीतर्फे रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली होती. तथापि, सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे खड्डे बुजविलेल्या रस्त्यांवर पुन्हा खड्डे पडले होते.

त्यामुळे लोकप्रतिनिधी रिक्षा युनियन, सामाजिक संस्था यांच्या मागण्या व वारंवार होणारी उपोषणे विचारात घेऊन सदर खड्डे तातडीने भरण्यात आले.
(३) हे खरे आहे.
(४) उल्हासनगर शहरातील नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने व नियमानुसार खड्डे भरण्याची कार्यवाही करण्यात आल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत**

**(४४) ६७६७६ (१६-०१-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील खर्चवाढ आणि न्यायप्रविष्ट बाबींमुळे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प ८ हजार ४०० सदनिकांपर्यंतच सीमित राहणार आहे असे माहे जुलै, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित ९ हजार ५२० सदनिकांसाठी मिळालेला निधी साडेनऊ टक्के व्याज दराने केंद्र शासनाला परत करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेशी संबंधित बेजबाबदार अधिकाऱ्यांमुळे महापालिकेला कोटयवधी रुपयांचा आर्थिक तोटा सहन करावा लागणार असल्याने शासनाने त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२१-०४-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.
केंद्र शासनाने शहरी गरीबांना मुलभूत गरजा पुरविणे (BSUP) या योजनेतंर्गत दि.१७.९.२०१५ च्या सुधारीत मंजूरीनुसार एकूण १७९२० घरकुलांचा प्रस्ताव एकूण ८२८८ घरकुलांसाठी सिमित केला आहे.
(२) हे खरे आहे.
केंद्र शासनाच्या धोरणानुसार वितरीत केलेला अतिरिक्त निधी व्याजासह महानगरपालिकेला केंद्र शासनास परत करावा लागणार आहे. (Benchmark Prime Lending Rate नुसार)
(३) व (४) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरी गरीबांना मुलभूत गरजा पुरविणे (BSUP) या योजनातंर्गत सुरु असलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प in-situ स्वरुपाचे असून या प्रकल्पस मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्थगिती आदेश दिलेले आहेत. त्यामुळे सदर प्रकल्प पूर्ण करण्यास विलंब होत आहे.

---

**म्हारळ, उल्हासनगर (जि.ठाणे) येथील डंम्पीग ग्राऊड ओव्हरफ्लो झाल्याबाबत**

**(४५) ६८२३९ (१६-०१-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हारळ, उल्हासनगर (जि.ठाणे) येथील डंम्पीग ग्राऊंडवरील दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी कचऱ्याचा ढिग झोपडपट्टीवर पडून दोन युवकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी शेकडो फूट कचऱ्याचा ढिग उभा असून डंम्पीग ग्राऊंडची क्षमता संपली असतानासुध्दा त्यावर कचरा टाकण्यात येत असल्याने भविष्यात मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) म्हारळ गावाजवळील डंपिंग ग्राऊंड येथे दिनांक २४.०९.२०१६ व दिनांक ०२.१०.२०१६ रोजी पावसाळ्यामुळे कचऱ्याचा मोठा ढिग कोसळला ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, यात २ युवकांचा मृत्यू झाला हे खरे नाही.

(२) दिनांक ०२.१०.२०१६ रोजी कचऱ्याचा ढिग कोसळ्याच्या घटनेनंतर, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन निर्माण होणारा अंदाजित ४१० मे. टन घनकचरा राणा ट्रेडिंग कंपनीजवळ, म्हारळ गांव, उल्हासनगर-१ येथे टाकणे बंद करण्यात आले आहे.

तथापि, अन्य पर्याय उपलब्ध नसल्याने, सदर घनकचरा खडी मशीद जवळील पडीत खदाण, गायकवाड पाडा, उल्हासनगर-५ येथे टकण्यात येत आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- घनकचरा व्यवस्थापनासाठी सरकारी जागा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.
- खाजगी करारान्वये जागा खरेदी करुन उपलब्ध होण्यासाठी वृत्तपत्रात जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले आहे.
- शहरात निर्माण होणारे डेब्रीज, रॅबीट तसेच इतर बांधकामाचे टाकाऊ साहित्य यापासून ब्रिक्स अथवा इतर वस्तु बनविण्यासाठी जागेसह व जागेविना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (स्वारस्याची अभिव्यक्ती) वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.
- नागरी घनकचऱ्यातून वेगळे केलेल्या प्लास्टीक वेस्टपासून पायरोलायसिस तंत्रज्ञानाने इंधन तयार करण्याच्या प्रकल्पाची पी.पी.पी. तत्वावर उभारणी करणे व ७ वर्षे कालावधीसाठी निगा व देखभाल करणे या कामासाठी अनुभवी संस्थांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती प्रपत्र ई-निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**मुंबई शहरातील ५६ वसाहतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) ६८३८४ (१६-०१-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात म्हाडा आणि महानगरपालिकेच्या विलंबामुळे म्हाडाच्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास प्रलंबित राहिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्विकास रखडल्याने रहिवाश्यांना विकासकाकडून मिळणारे भाडे दिले जात नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मुंबईतील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तसेच आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०५-२०१७) :**(१) म्हाडाच्या बृहन्मुंबई हद्दीतील ५६ वसाहतीमध्ये मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी शासन निर्णय दि.०६.१२.२००८ नुसार बृहनमुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३ (५) अन्वये म्हाडा अभिन्यासातील पुनर्विकासासाठी २.५ चक्षेनि लागू करण्यात आला होता. सद्य:स्थितीत सदरहू ५६ वसाहतींमधील १०४ अभिन्यासांपैकी ४१ अभिन्यास ३.०० च.क्षे.नि. ने आकडेमोड करुन बृहन्मुंबई महानगपालिकेस मंजुरीस्तव सादर केले आहे. तसेच सदरहू अभिन्यासातील प्रोराटा चटई क्षेत्रफळाच्या मंजुरीबद्दल अभिन्यासाचे संबंधित वास्तुशास्त्रज्ञ, लोकप्रतिनिधी व उपाध्यक्ष, म्हाडा यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे सोबत वारंवार बैठका घेऊन प्रोराटा वितरण व मंजुरीबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार पुनर्विकास प्रस्तावास मंजुरी देण्याचे प्रस्तावित आहे असे उपाध्यक्ष, म्हाडा यांनी कळविले आहे.

(२) संस्थानिहाय रहिवाश्यांना बिल्डरकडून भाडे न मिळण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचेसोबत संयुक्त बैठक घेऊन रहिवाशांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत प्रयत्न करण्यात येत आहे असे म्हाडाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(३) व (४) लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे पुनर्विकासाच्या सुधारित विकास नियंत्रण नियमावलीची मागणी केलेली असून त्यानुसार वि.नि.नि. ३३(५) च्या दि.०८.१२.२०१३ अधिसूचनेमध्ये फेरबदल करण्याची सूचना नगर विकास विभागाने दि.०५.०१.२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. त्यावरील हरकती व सूचनांचा विचार करुन अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहराला स्मार्ट सिटी करण्याबाबत**

**(४७) ६८९५९ (१६-१२-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील झोपडपट्यांना आधुनिक सोईसुविधा देवून नागपूर शहर झोपडपट्टी मुक्त करुन स्मार्ट सिटी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहराला स्मार्ट सिटी करण्याचे दृष्टीने शासनाने काय नियोजन केले आहे व त्यानुसार नागपूर शहरात कोणकोणत्या योजना राबविण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, त्यापैकी कोणकोणत्या योजना सुरू करण्यात आल्या आहेत व त्यापैकी किती योजना पूर्ण झाल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी किती खर्च अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियांनातर्गतच्या दुसऱ्या फेरीत नागपूर शहराची निवड झाली आहे.

(२) योजनेच्या निकषा प्रमाणे प्रतिवर्षी केंद्र शासन रु.१०० कोटी, राज्य शासन रु.५० कोटी प्रमाणे निधी देणार आहे. प्रतिवर्षी महानगरपालिकेचा रु. ५० कोटी सहभाग राहिल.

केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नागपूर महानगरपालिकेच्या प्रस्तावानुसारची क्षेत्राधिनिस्त विकास (Area Based Development) व पॅन सिटी सोल्युशन अंतर्गतची Smart and Safe Nagpur असे दोन प्रकल्प समाविष्ट केलेले आहेत.

राज्य शासनाने राज्याच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत नागपूर स्मार्ट ॲण्ड सेफ सिटी हा एकुण रु.५२० कोटी अपेक्षित खर्चाचा प्रकल्प हाती घेतला आहे.

नागपूर शहरात १०० ठिकाणी स्मार्ट किऑस्क स्थापीत करण्याचे प्रस्तावित असून त्यामध्ये पॅनिक बटन नागरिकांकरीता आपात्कालीन व अपघाताच्या वेळेस उपयोगात येणार आहे.

नागपूर शहराकरीता सिटी ऑपरेशन सेंटर नागपूर महानगरपालिका मध्ये प्रस्तावित असून त्यात आपात्कालीन व्यवस्थेकरीता मॅनेजमेंट प्रस्तावित आहे. (अग्निशमन, आरोग्य सेवा, पोलीस सेवा)

- क्षेत्राधारीत विकास (Area Based Development ) :- अंतर्गत पारडी, पुनापुर व भरतवाडा येथे नगररचना परियोजना राबविणे प्रस्तावीत आहे.

(३) नागपूर सेफ ॲण्ड स्मार्ट सिटी प्रकल्पाची सुरुवात झाली आहे. एरिया बेस डेव्हलपमेंन्ट अंतर्गत टाऊन प्लॅनिंग स्किम राबविण्यासाठी नुकतीच एजन्सी निश्चित केली आहे. कामे प्रगतीत आहेत.

(४) अपेक्षित खर्च :-

- नागपूर सेफ ॲण्ड स्मार्ट सिटी प्रकल्पाकरीता रु.५२० कोटी.
- एरिया बेस डेव्हलपमेंट अंतर्गत पारडी, पुनापुर भरतवाडा येथे नगर रचना योजना करीता रु.८७६ कोटी.

• स्मार्ट सिटी अभियानाअंतर्गत सर्व कामे पुर्ण करण्यासाठी अंदाजे रु.३३५१ कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

---

## मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातील बाके खरेदी

**(४८) ७१७११ (१६-०१-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षासाठी महापालिका शाळेतील बाकांच्या खरेदीसाठी विशेष निधी मंजूर केला होता व त्यानुसार १४ हजार ७९१ बाकांची खरेदी करण्यात आली असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे, २०१६ मध्ये ही खरेदी प्रक्रिया पूर्ण करून जूनपासुन नवीन शैक्षणिक वर्षात फायबर आणि लोखंड वापरून तयार केलेली ही बाके वापरण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील देवनार, मालवणी भागातील अनेक महापालिका शाळांमध्ये या बाकांची दुरावस्था झाली असून अनेक बाके तुटलेल्या अवस्थेत आहेत व अनेकांची वेल्डिंग निघाले आहेत असेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे, त्यात काय आढळुन आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

महानगरपालिकेच्या ए ते टी विभागातील महापालिका शाळांसाठी डेस्क बेंचचा पुरवठा करण्यात आला होता, त्यापैकी देवनार व मालवणी विभागातील डेस्क बेंचेस तुटलेल्या अवस्थेत आढळून आले.

तथापि, वेल्डिंग निघालेले डेस्क बेंचेस वॉरंटी कालावधीत असल्याने सदर बेंचेस अटी व शर्तीनुसार दुरुस्त करुन घेण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भांडूप (पश्चिम) येथील एल.बी.एस.मार्गावरील न.भू.क्र.२४१ (भाग) या भूखंडाबाबत

**(४९) ७२०५३ (१६-०१-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (पश्चिम) येथील विधानसभा क्षेत्रातील एल.बी.एस. मार्गावरील न.भू.क्र.२४१ (भाग) विकसित करतांना नागरी सुविधांसाठी दिलेला ५ टक्के भूखंड हा महानगरपालिकेच्या ताब्यात असतांना मे.जैनम या विकासकाने महानगरपालिकेच्या अधिका-यांशी संगनमत करुन सदर भूखंडावर अतिक्रमण करुन भुखंडावरील संरक्षण भिंती तोडून व महानगरपालिकेने लावलेले फलक हटवून गोदाम बांधून जागा गिळंकृत केल्याची तक्रार स्थानिक विधानसभा सदस्य यांनी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त व मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१६ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित विकासकांवर व महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर न.भू.क्र. २४१, २४१/१ ते १४, मौजे भांडुप या औद्योगिक वापरातील भुखंडावर वाणिज्य व निवासी वापर बदल करतांना पूर्वी विकास नियंत्रण नियमावली कलम ५७(४) (सी) नुसार ५% सुविधा क्षेत्र देय होते.

त्यानुसार सदर सुविधा क्षेत्र विकासकाने दिनांक २२.०७.२०१४ रोजी महानगरपालिकेस हस्तांतरीत केले होते.

तद्नंतर मा.उच्च न्यायालयातील प्रकरण क्रमांक ६५१/२०१३ मधील दिनांक १३.०३.२०१४ रोजीच्या आदेशानुसार, रस्ता पिछेहाटीच्या क्षेत्राशी सुविधा भूखंड क्षेत्र समायोजित करुन सुधारीत वापर बदल परवानगी देण्यात आली.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार व महाधिवक्ता, महाराष्ट्र शासन यांच्या अभिप्रायानुसार महानगरपालिकेमार्फत जारी करण्यात आलेल्या दिनांक ०२.०४.२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार सुविधा भूखंड क्षेत्र देय नाही.

यास्तरव विकासकाने पूर्वी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला सुविधा भूखंड दिनांक २२.०४.२०१६ रोजी विकासकास पुन्हा हस्तांतरीत करण्यात आला आहे. त्यामुळे सदर सुविधा भूखंडाच्या भोवताली कुंपण भिंत व महानगरपालिकेचा फलक असणे आवश्यक नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एरंडोल नगरपालिकेच्या (जि.जळगाव) गलिच्छवस्ती सुधारणा योजनेबाबत**

**(५०) ७२१५१ (१६-०१-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल नगरपालिकेद्वारे (जि.जळगाव) गलिच्छवस्ती सुधारणा योजनेअंतर्गत गट नं.२३५ मध्ये घरकुले मंजूर करून पद्मालय कन्स्ट्रक्शन कंपनीला माहे नोव्हेंबर, २०१३ मध्ये कार्यादेश देण्यात आलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची किंमत ९ कोटी ६५ लाख रूपये असून त्यापैकी ४ कोटी, ३६ लाख, ३३ हजार रूपये पद्मालय कन्स्ट्रक्शन कंपनीला अदा करून सदर घरकुलाचे काम एक वर्ष मुदतीत करणेबाबत करारात नमूद करण्यात आलेले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घरकुलाचे बांधकाम अद्यापही पूर्ण झालेले नसून बांधकामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट प्रतीचा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधीत कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-०४-२०१७)** :(१) एरंडोल नगरपरिषद, जि.जळगाव यांच्यामार्फत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजनांतर्गत एकूण २८८ घरकुलांच्या कामासाठी एरंडोल नगरपरिषदेमार्फत मे. पद्मालय कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यारंभ आदेश (work order) देण्यात आले आहेत.
(२) केंद्र शासनाने या प्रकल्पांतर्गत एरंडोल नगरपरिषदेस रु.९६५.०८ लक्ष इतकी रक्कम मंजूर केली असून नगरपरिषदेने रु.३७८.५० इतका खर्च केलेला आहे. तसेच घरकुलांची कामे एक वर्ष मुदतीत करण्याबाबत करारात नमूद करण्यात आलेले आहे.
(३), (४) व (५) या योजनेअंतर्गत घरकुलांच्या कामाची पाहणी कार्यकारी अभियंता, धुळे विभाग, नाशिक मंडळ यांनी केली असून त्याबाबतचा अहवाल नगरपरिषदेस दि.०४.०७.२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आला आहे. सदर अहवालानुसार नगरपरिषदेने बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्याचे सुचित केले आहे (स्ट्रक्चरल ऑडीटसह इतर कार्यवाही एरंडोल नगरपरिषद यांचेस्तरावर प्रलंबित आहे) केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे मंजूर २८८ घरकुल ३१ मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण करुन नगरपरिषदेने लाभार्थ्यांना ताबा देणे आवश्यक आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.